# पुणे विद्यापीठ

## निवडणूक सूचना
## गट - अ - यादीतील विद्याशाखा

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम १५(२)(ए),(बी) नुसार गट ''अ'' यादीतील विद्याशाखांच्या अधिष्ठाता पदाची निवडणूक.**

(१) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम १५(२)(ए),(बी) नुसार गट ''अ'' यादीतील विद्याशाखा सदस्यांना संबंधित विद्याशाखेवर अधिष्ठाता म्हणून निवडून देण्यासाठी **परिनियम ३६६ व ३७३(सी) नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.**

या संदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

15(2)(a) The Dean of every faculty shall be elected by the members of the faculty from amongst themselves and shall not be eligible for election for a second consecutive term.

15(2)(b) No member assigned by the academic council on the faculty shall be eligible to contest the election for the post of the Dean.

**सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील**

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख, वार व वेळ (परिनियम ३६८) | शुक्रवार, दि. २९ एप्रिल, २०११ दुपारी ४.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| २ | उमेदवारी अर्जांच्या छाननीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७१) | शुक्रवार, दि. २९ एप्रिल, २०११ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७०, ३७५) | सोमवार, दि. २ मे, २०११ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| ४ | निवडणूकीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३६६ व ३७३(सी)) | मंगळवार, दिनांक १० मे, २०११ **सोबत जोडलेल्या वेळापत्रकाप्रमाणे** | आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |
| ५ | मतमोजणी | मंगळवार, दिनांक १० मे, २०११ मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच | आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ |

**(टीप : नमूद केलेल्या वेळेतच मतदान करता येईल.)**

(२) उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करुन घ्यावा आणि उमेदवारी अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करतेवेळी अर्जाची किंमत रु. १०/- (अक्षरी रुपये दहा) रोख स्वरुपात निवडणूक विभाग, पुणे विद्यापीठ येथे जमा करावी.

(३) संबंधित विद्याशाखेच्या मतदार यादीतील कोणतेही दोन सदस्य मतदार, संबंधित विद्याशाखेच्या मतदार यादीतील उमेदवारीस पात्र असलेल्या कोणत्याही सदस्यास उमेदवार म्हणून सूचित किंवा अनुमोदित करू शकतात. (परिनियम ३६७)

(४) संबंधित विद्याशाखेत तीनपेक्षा कमी सदस्य असल्यास उमेदवार स्वतःचे नाव स्वतःच सूचित आणि/किंवा अनुमोदित करू शकतो. अन्यथा उमेदवार स्वतःचे नाव स्वतःच सूचित किंवा अनुमोदित करू शकणार नाही. (परिनियम ३६९)

योग्य रितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी दाखल केलेले उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील. (परिनियम ३६९)

(५) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर हे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३७२)

(६) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी सभेपूर्वी चार दिवस अगोदर जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३८०)

(७) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा मंडळाची प्रत्येक निवडणूक प्रमाणशीर, प्रतिनिधीत्व पध्दतीनुसार, एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमाव्दारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल.

**(८) मतदाराने मतदानाच्या वेळी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा ते ज्या संस्थेत सेवेत आहेत तेथील नियोक्त्याचे ओळखपत्र किंवा सर्वसाधारण (जनरल) निवडणुकीसाठी सक्षम प्राधिका-याने दिलेले ओळखपत्र, प्राप्तीकर कार्यालयाने दिलेले पॅनकार्ड किंवा तत्सम ओळखपत्र दाखविल्याशिवाय त्यांना मतपत्रिका मिळणार नाही.**

(९) अर्ज छाननी, मतदान आणि मतमोजणीच्या वेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील त्यांचा एक प्रतिनिधी वेळेपूर्वी किमान अर्धा तास अगोदर पूर्वसूचना देऊन हजर राहू शकतो. (परिनियम ३७१ व ३८२)

(१०) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४ सप्टेंबर, २००९ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली महाराष्ट्र शासन व पुणे विद्यापीठाची परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील.

**(११) उमेदवारी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा नामनिर्देशन पत्र अग्राह्य ठरविण्यात येईल.**

- अ) किमान १० वर्ष अध्यापनाचे अनुभवाचे प्रमाणपत्र.
- ब) विभागप्रमुख म्हणून किमान ३ वर्षाचे अनुभवाचे प्रमाणपत्र.
- क) मान्यताप्राप्त / विख्यात राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय जर्नलसमध्ये बारकाईने पुनर्विलोकन केलेले किमान ३ संशोधन प्रकाशित केलेले पेपर या संदर्भातील पुरावा.
- ड) पीएच.डी. मार्गदर्शक मान्यतापत्र.
- इ) विद्यापीठ पातळीवर पेपर सेटर / परीक्षक / नियामक (Moderator) / अध्यक्ष / समन्वयक म्हणून किमान ५ वेळा काम केल्याचे प्रमाणपत्र.

(१२) उमेदवार हा महाविद्यालयीन प्राचार्य असेल तर वरील "अ" व "ब" चे प्रमाणपत्र संस्था चालकांकडून घ्यावे आणि "इ" चे प्रमाणपत्र विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रक यांच्याकडून घ्यावे. उमेदवार हा महाविद्यालयीन अध्यापक असेल तर "अ", "ब" व "इ" चे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे घ्यावे. उमेदवार हा विद्यापीठ विभागाचा प्रमुख असेल तर वरील "अ" व "ब" चे प्रमाणपत्र विद्यापीठाच्या प्रशासन शिक्षक कक्षाकडून आणि "इ" चे प्रमाणपत्र विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रकांकडून घ्यावे आणि उमेदवार हा विद्यापीठ अध्यापक असेल तर "अ" व "ब" चे प्रमाणपत्र विद्यापीठाच्या प्रशासन शिक्षक कक्षाकडून आणि "इ" चे प्रमाणपत्र संबंधित विभागप्रमुखांकडून घ्यावे.

(१३) सोबत जोडलेल्या वेळापत्रकाप्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच मतमोजणी होऊन निवडणुकांचे निकाल जाहीर होतील.

गणेशखिंड, पुणे ४११००७
संदर्भ क्र. पुविनि/२३१
दिनांक : १९ एप्रिल, २०११

मा. कुलगुरू यांच्या आदेशावरुन

( डॉ. मा. ल. जाधव)
**कुलसचिव**

**प्रति : 'अ' गटातील संबंधित विद्याशाखेचे मतदार सदस्य.**

# Meeting Schedule of Faculty

## (Group-A)

### *** Dt. 10/05/2011 ***

| Sr. No. | Name of Faculty | Date | Meeting Time | Election Time | Counting |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mental, Moral & Social Sciences | 10/05/2011 | 11.00 am | 11.30 to 12.30 | After Election |
| 2 | Science | | | | |

| Sr. No. | Name of Faculty | Date | Meeting Time | Election Time | Counting |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Commerce | 10/05/2011 | 3.00 pm | 3.30 to 4.30 | After Election |
| 2 | Education | | | | |

# Meeting Schedule of Faculty

## (Group-B)

### *** Dt. 11/05/2011 ***

| Sr. No. | Name of Faculty | Date | Meeting Time | Election Time | Counting |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Arts, Fine Arts & Performing Arts | 11/05/2011 | 11.00 am | 11.30 to 12.30 | After Election |
| 2 | Pharmaceutical Sciences | | | | |

| Sr. No. | Name of Faculty | Date | Meeting Time | Election Time | Counting |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Engineering | 11/05/2011 | 3.00 pm | 3.30 to 4.30 | After Election |
| 2 | Law | | | | |

प्रा. कुलसचिव